# परब्रह्म शक्ती स्फुरो.....

हिंदुस्थान जगात श्रेष्ठ व्हायला हवा आहे ना, तर मग म्हणा की 'परब्रह्मशक्ती स्फुरो माझिया अंतरात!' तुमच्यामध्ये परब्रह्मशक्तीचं अवतरण व्हायला नको का? जसं अन्न खाल्ल्यावर त्याची शक्ती होते तसं परमेश्वराची उपासना केल्यानं त्याची शक्ती आपल्याला प्राप्त होते हे अगदी खरं आहे. शंभर नाही, पाचशे टक्के खरं आहे. मी स्वत: अनुभवलेलं आहे. आपल्याला सुद्धा ते अनुभवता येईल. कोटी कोटी लोकांना उपासनेला बसवलं पाहिजे.

(राष्ट्रदेवो भव)

कृतिकार्यक्रम : दैनंदिन वैयक्तिक उपासना,
साप्ताहिक सामूहिक उपासना, वर्षारंभ - वर्षान्त उपासना